महाराष्ट्र शासन
जिल्हा परिषद, गडचिरोली
(ग्राम पंचायत विभाग)

ग्रा.पं. विभाग, जि.प. गडचिरोली तळ मजला, खोली क्र. 19, जिल्हा पेसा कक्ष, मुल रोड, कॉम्पलेक्स गडचिरोली 442605
दुरध्वनीक्र. 07132-222308 ईमेल- dceopanchayatgadchiroli@gmail.com
pesacellzpgadchiroli@gmail.com

| जा.क्र./जिपग/पंचा/पेसा/प्र.क्र.68/30/2025-26 | दिनांक : 29 जानेवारी, 2026 |
| --- | --- |

प्रति,

**सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचातय कार्यालय, -------------- (सर्व)

**मार्फत :** गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहेरी/आरमोरी/भामरागड/चामोर्शी/देसाईगंज/धानोरा/एटापल्ली/गडचिरोली/कोरची/कुरखेडा/मुलचेरा/सिरोंचा

**विषय :** **गौण वनोपज वाहतूक परवाना निर्गमित करण्याबाबत शासन निर्णय दिनांक 27 नोव्हेंबर, 2025 चे मार्गदर्शक सुचने नुसार नियमोचित कार्यवाही करण्याबाबत...**

**संदर्भ :**
1. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी जारी केलेली अधिसूचना, क्रमांक आरबी/टीसी/ई-11019(15) (2014)/अधिसूचना-3/बांबू-एमएफपी/741, दिनांक 19 ऑगस्ट, 2014
2. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी जारी केलेली अधिसूचना, क्रमांक आरबी/टीसी/ई-11019(89) (2013)/अधिसूचना-4/1120/2014, दिनांक 30 ऑक्टोबर, 2014
3. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी जारी केलेली अधिसूचना, क्रमांक आरबी/टीसी/ई-11019(15) (2014)/अधिसूचना-6/24/2015, दिनांक 09 जानेवारी, 2015
4. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी जारी केलेली अधिसूचना, क्रमांक आरबी/टीसी/ई-11019(15) (2014)/अधिसूचना-एमएफपी/1407, दिनांक 15 ऑक्टोबर, 2016
5. शासन निर्णय, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, क्रमांक : पेसा-2012/प्र.क्र.65/पंरा-2, दिनांक 23 नोव्हेंबर, 2015
6. शासन निर्णय, ग्राम विकास व पंचायतराज विभाग,क्रमांक : पेसा-2012/प्र.क्र.65/पंरा-2, दिनांक 17 डिसेंबर, 2015
7. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :वहका-2024/प्र.क्र.62 (2) (E-1305686)/का-14, दिनांक 27 नोव्हेंबर, 2025

****

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, **"पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, 1996"** (पेसा कायदा) अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना लागू करण्यात आलेला आहे. या अधिनियमाच्या कलम 4 (ड) (दोन) मधील तरतूदीनुसार गौण वन-उत्पादनाची

Scanned with OKEN Scanner

मालकी समुचित स्तरावरील पंचायत व ग्रामसभांकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. तसेच मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी जारी केलेल्या संदर्भ क्रमांक 2 मधील अधिसूचनेनुसार **"भारतीय वन अधिनियम**, 1927" या अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली असून अनुसूचित क्षेत्रांमधील गौण वनोत्पादनांबाबत प्रकरण तीन-क समाविष्ट करण्यात आले असून या अधिनियमाच्या कलम 28 (क) मध्ये तरतूद केलेनुसार समुचित स्तरावरील पंचायती आणि ग्रामसभा किंवा त्यांची समिती अनुसूचित क्षेत्रातील वनोत्पादनांच्या वाहतुकीसंबंधातील वाहतूक परवान्यामध्ये फेरबदल करतील व तो देतील तसेच अनुसूचित क्षेत्रांतील गौण वनोत्पादने गोळा करण्यासंबंधीचे व त्यांची विक्री उत्पन्न विभागून घेण्यासंबंधीचे सर्व निर्णय, समुचित स्तरावरील पंचायतींकडून आणि संबंधीत ग्रामसभांकडून घेण्यात येईल, असे नमुद करण्यात आले आहे.

तथापी संदर्भीय क्रमांक 7 चे शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेनुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम 2006 नियम 2008 व सुधारणा नियम 2012 च्या कलम 3 (1) (ग), नियम 2 (1) (घ) व नियम 4 (1) 'छ' मधील व पंचायतीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित अधिनियम) 1996 मधील कलम (m) (i) व महाराष्ट्र ग्रामपंचायती संबधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करण्याबाबत) नियम, 2014 मधील प्रकरण नऊ मधील तरतूदीनुसार वन विभागाने वाचा मधील अनु.क्र.7 मधील शासन निर्णयान्वये गौण वनोपज वाहतूक परवाने संदर्भात आदिवासी विकास विभागावर सोपविलेली जबाबदरी विचारात घेता अनूसूचित क्षेत्रातील गौण वनोपजांची वाहतुक करण्यासाठी वाहतुक परवाना ग्रामसभेमार्फत छापून ग्रामसभेमार्फत निर्गमित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

2. वाहतुक परवानाच्या (Transit Permit) संदर्भात कार्यप्रणाली खालीलप्रमाणे राहील :-

I. गौण वनोपज वाहतुक परवान्याचा नमूना सोबत जोडला आहे.

II. सदर वाहतूक परवान्याचा रंग फिका हिरवा (Light Pista Green) राहील.

III. नमुन्यामध्ये वाहतुक परवाना पुस्तकाचे मुद्रण मार्गदर्शक सुचने नुसार ग्रामपंचायतींनी करुन घ्यावेत, संबधित ग्रामसभांचे मागणी नुसार वाहतुक परवाना (TP) बुक व ग्रामसभेचा शिक्का विनामुल्य ग्रामसभेनी प्राधीकृत केलेल्या व्यक्ती/समितीकडे उपलब्ध करुन द्यावेत.

IV. प्रत्येक वाहतूक परवाना पुस्तक हे 50 पानांचे राहील. छपाई करतांना परवान्यावरील क्रमांक हा चढत्या क्रमाने राहील.

V. संदर्भीय क्रमांक 7 चे शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टामधील परवाना नमुन्यावर दर्शविल्याप्रमाणे (गौण वनोपज परवाना) वॉटर मार्क अंकित करण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

VI. सदर परवाना नमूना घडी पत्रक स्वरुपात (4 घडीचे) राहील. यामध्ये ग्रामसभेसाठी स्थळप्रत, संबंधत बिट गार्डची प्रत, संबंधित वन कार्यालयाची प्रत व वाहतूक कर्त्याची प्रत याचा समावेश राहील.

VII. वाहतूक परवान्याची छपाई केल्यानंतर सदर परवान्याचे क्रमांक संबंधित वन कार्यालयास/जिल्हा प्रशासनास कळविणे संबधित ग्रामपंचायतीस बंधनकारक राहील.

VIII. ग्रामसभेच्या मान्यतेने वाहतूक पास देण्यासाठी प्रत्येक आर्थिक वर्षाकरीता प्राधिकृत केलेल्या (नव्याने किंवा पुर्ननियुक्ती) व्यक्तीच्या निवडीचे ग्रामसभा ठरावाची सत्यप्रत व सहपत्रीत दिलेल्या नमुना स्वाक्षरी प्रपत्रामध्ये संबंधीत ग्रामसभा/पंचायतीने वनपरिक्षेत्र कार्यालय व जिल्हा पेसा कक्ष (जि.प. गडचिरोली) यांना निवड झालेचे दिनांक पासुन 15 दिवसाचे आत अहवालाद्वारे कळविणे बंधनकारक राहील.

IX. वाहतुक परवाना निर्गमित केल्यानंतर वाहतूक परवान्याची प्रत संबधित बिट गार्ड व संबधित वन कार्यालय सांना देणे संबधित ग्रामसभेस बंधनकारक राहील.

X. गौण वनोपज वाहतुक राज्यामध्ये (एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात किंवा जिल्ह्यामध्ये) अथवा राज्यातून इतर राज्यामध्ये करण्यासाठी परवाना निर्गमित करतांना यथास्थिती आवश्यक ते परवाने संबधित ग्रामसंभा यांनी वाहतूक करणाऱ्या संस्था/फेडरेशन यांना आवश्यकतेनुसार द्यावे.

XI. संबधित संस्था/फेडरेशन यांनी गौण वनोपजाच्या राज्यामधील (एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात किंवा जिल्ह्यामध्ये) अथवा राज्यातून इतर राज्यामधील पुढील वाहतुकीसाठी त्यांना संबधित ग्रामसंभांनी उपलब्ध करुन दिलेले वाहतूक परवाना निर्गमित केल्यावर सदर वाहतूक परवान्याची प्रत संबधित बिट गार्ड, संबधित वन कार्यालय व संबधित ग्रामसभा यांना देणे बंधनकारक राहील. ग्रामसभेस परत दिलेल्या परवाना प्रतीची छायांकित प्रत संबंधित संस्था/फेडरेशन त्यांच्याकडे ठेवतील.

XII. वरील IX व X अनुसार वेगळ्याने परवाने छापण्याची आवश्यकता भासल्यास वरील । ते VIII मधील अटींची पूर्तता करुन परवाने छापण्याची संबंधित ग्रामसभांना मुभा राहील.

XIII. वरीलप्रमाणे कार्यवाही करतांना वाहतूक परवाना संदर्भात ग्रामसभा व वन विभाग यांच्यामध्ये काही वाद अथवा संभ्रम निर्माण झाल्यास त्याबाबत अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम 2006 नियम 2008 व सुधारणा नियम 2012 अंतर्गत गठीत केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय वनहक्क समितीने त्यांचे स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

XIV. भविष्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेऊन वाहतूक परवाना संदर्भात अधिक सुलभता येण्याच्या दृष्टीने Digitalisation किंवा QR Code आधारित वाहन परवाने कार्यपद्धतीची अंमलबजावणी करावयाची आवश्यकता भासल्यास या प्रकरणी संबधित ग्रामसभेस त्याबाबत जिल्हास्तरीय वनहक्क समितीस अवगत करून पुढील कार्यवाही करता येईल.

वरील मार्गदर्शक सुचने नुसार अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांनी वाहतुक परवानाच्या (Transit Permit) संदर्भात कार्यप्रणालीचा अवलंब करावा.

**सहपत्र** : 1. संदर्भीय क्रमांक 7 चे शासन निर्णय
2. वाहतुक परवाना (Transit Permit)
3. नमुना स्वाक्षरी प्रपत्र - अ
4. ग्रामसभा शिक्का (गौण वनोपज वाहतू परवाना)

**(सुहास गाडे, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

**प्रत माहितीस सविनय सादर :**

1. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.
2. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली.
3. उप वनसंरक्षक कार्यलय, गडचिरोली/वडसा/आलापल्ली/भामरागड/सिरोंचा

**प्रत कार्यवाहीस्तव अग्रेषित :**

1. संचालक, राज्य पेसा कक्ष, महाराष्ट्र राज्य पुणे.
2. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) तथा नोडल अधिकारी (पेसा), जिल्हा परिषद, गडचिरोली.
3. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहेरी/आरमोरी/भामरागड/चामोर्शी/देसाईगंज/धानोरा/एटापल्ली/गडचिरोली/कोरची/कुरखेडा/मुलचेरा/सिरोंचा

Scanned with OKEN Scanner

शासन निर्णय क्र.- वहका-२०२४/प्र.क्र.६२(२)/का-१४ दि.२७/११/२०२५

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ व पंचायतींचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित अधिनियम) १९९६ अन्वये प्राप्त अधिकारान्वये अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोपजांकरीता वाहतुक परवाना.**

(ग्रामसभेची प्रत) क्र.-------

१) जिल्हा______तालुका______गाव_
२) जिल्हास्तरीय समितीने वहनक्क मान्य केल्याचा क्रमांक व दिनांक______________
३) ग्रामसभेचे नाव____________________
४) जेथून माल हलविणेत येत आहे तो वनकुप किंवा भाग क्र. आणि पातनश्रेणी किंवा गट किंवा अन्य घटक (नाव)__________
५) वाहतूक पास देण्यासाठी ग्रामसभेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिचे/**संस्थेचे**/फेडरेशनचे नाव--------------
६) गौण वनोपजाचे वर्णन (उपजाचे नाव) वस्तु प्रकार, दर्जा, मोजमाप, संख्या / नग / वजन इ.---------
७) **माल विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता**____________________
८) वाहतुकीचे साधन___________________
९) गाडीचा क्रमांक (असल्यास)____________
१०) वाहन चालकाचे नाव______________
११) **वाहतुक सुरु केल्याची दि.व वेळ____**
१२) जाण्याचे ठिकाण______________
१३) गौण वनोपज वाहतुकीचा मार्ग______
१४) परवान्याची कालमर्यादा -------

**परवाना देणा-याचे नाव व स्वाक्षरी,
ग्रामसभेचा शिक्का व दि**

---

शासन निर्णय क्र.- वहका-२०२४/प्र.क्र.६२(२)/का-१४ दि.२७/११/२०२५

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ व पंचायतींचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित अधिनियम) १९९६ अन्वये प्राप्त अधिकारान्वये अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोपजांकरीता वाहतुक परवान**

(वाहतूक कर्त्याची प्रत) क्र.------

१) जिल्हा_______तालुका_________गाव_
२) जिल्हास्तरीय समितीने वहनक्क मान्य केल्याचा क्रमांक व दिनांक_____________
३) ग्रामसभेचे नाव______________________
४) जेथून माल हलविणेत येत आहे तो वनकुप किंवा भाग क्र. आणि पातनश्रेणी किंवा गट किंवा अन्य घटक (नाव)_________
५) वाहतूक पास देण्यासाठी ग्रामसभेने प्राधिकृत केलेल्या
६) व्यक्तिचे /संस्थेचे/फेडरेशनचे नाव--------------
७) गौण वनोपजाचे वर्णन (उपजाचे नाव) वस्तु प्रकार, दर्जा, मोजमाप, संख्या / नग / वजन इ.---------
८) **माल विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता**__________________
वाहतुकीचे साधन__________________
९) गाडीचा क्रमांक (असल्यास)____________
१०) वाहन चालकाचे नाव_______________
११) वाहतुक सुरु केल्याची दि.व वेळ____
१२) जाण्याचे ठिकाण____________
१३) गौण वनोपज वाहतुकीचा मार्ग_____
१४) परवान्याची कालमर्यादा -------

**परवाना देणा-याचे नाव व स्वाक्षरी,
ग्रामसभेचा शिक्का व दि**

---

**शासन निर्णय क्र.- वहका-२०२४/प्र.क्र.६२(२)/का-१४ दि.२७/११/२०२५**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ व पंचायतींचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित अधिनियम) १९९६ अन्वये प्राप्त अधिकारान्वये अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोपजांकरीता वाहतुक परवाना.**

**(बिट गार्डची प्रत)** क्र.----

१) जिल्हा_______तालुका_________गाव_
२) जिल्हास्तरीय समितीने वहनक्क मान्य केल्याचा क्रमांक व दिनांक_____________
३) ग्रामसभेचे नाव______________________
४) जेथून माल हलविणेत येत आहे तो वनकुप किंवा भाग क्र. आणि पातनश्रेणी किंवा गट किंवा अन्य घटक (नाव)_________
५) वाहतूक पास देण्यासाठी ग्रामसभेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिचे /**संस्थेचे/फेडरेशनचे** नाव---------------
६) गौण वनोपजाचे वर्णन (उपजाचे नाव) वस्तु प्रकार, दर्जा, मोजमाप, संख्या / नग / वजन इ.---------
७) **माल विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता**________________
८) वाहतुकीचे साधन___________________
९) गाडीचा क्रमांक (असल्यास)____________
१०) वाहन चालकाचे नाव_______________
११) **वाहतुक सुरु केल्याची दि.व वेळ____**
१२) जाण्याचे ठिकाण______________
१३) गौण वनोपज वाहतुकीचा मार्ग_____
१४) परवान्याची कालमर्यादा -------

**परवाना देणा-याचे नाव व स्वाक्षरी,
ग्रामसभेचा शिक्का व दि.**

---

**शासन निर्णय क्र.- वहका-२०२४/प्र.क्र.६२(२)/का-१४ दि.२७/११/२०२५**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ व पंचायतींचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित अधिनियम) १९९६ अन्वये प्राप्त अधिकारान्वये अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोपजांकरीता वाहतुक परवाना.**

(वन कार्यालयाची प्रत) क्र.----

१) जिल्हा________तालुका_________गाव_
२) जिल्हास्तरीय समितीने वहनक्क मान्य केल्याचा क्रमांक व दिनांक______________
३) ग्रामसभेचे नाव______________________
४) जेथून माल हलविणेत येत आहे तो वनकुप किंवा भाग क्र. आणि पातनश्रेणी किंवा गट किंवा अन्य घटक (नाव)___________
५) वाहतूक पास देण्यासाठी ग्रामसभेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिचे/ **संस्थेचे/फेडरेशनचे नाव**-----------------
६) गौण वनोपजाचे वर्णन (उपजाचे नाव) वस्तु प्रकार, दर्जा, मोजमाप, संख्या / नग / वजन इ.---------
७) **माल विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता**________________
८) वाहतुकीचे साधन___________________
९) गाडीचा क्रमांक (असल्यास)____________
१०) वाहन चालकाचे नाव_______________
११) **वाहतुक सुरु केल्याची दि.व वेळ_____**
१२) जाण्याचे ठिकाण______________
१३) गौण वनोपज वाहतुकीचा मार्ग______
१४) परवान्याची कालमर्यादा -------

**परवाना देणा-याचे नाव व स्वाक्षरी,
ग्रामसभेचा शिक्का व दि.**

Scanned with OKEN Scanner

## वाहतूक पास देण्यासाठी ग्रामसभेने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची माहिती

## गौण वनोपज वाहतूक परवाना - 20 --

### नमुना स्वाक्षरी प्रपत्र - अ

| अ.क्र. | प्राधिकृत व्यक्तीचे पुर्ण नांव | पत्ता | संपर्क क्रमांक | नमुना स्वाक्षरी | ग्रामसभेचा शिक्का |
|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | |

**सरपंच/प्रशासक**
**ग्रामपंचायत कार्यालय, -------**
**पंचायत समिती -------**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय, -------**
**पंचायत समिती -------**

---

**<u>ग्रामसभा शिक्का</u>**

**(गौण वनोपज वाहतूक परवाना देण्याकरीता)**

**विहित नमुन्यामध्ये तयार करुन घ्यावेत**

